# स्थावर मालाचे खरेदी खत

कि.रूपये २७,००,०००/— अक्षरी सत्तावीस लक्ष रूपये

मौजे मलकापूर भाग २ येथील स्थावर मालमत्ता

लिहुण देणार :— कुलवर्धीनी डेव्हलपर्स मलकापूर तर्फे पार्टनर
१. श्री पंकज चिमणलाल मुंधडा
वय अं. ५२ वर्षे, धंदा — व्यापार
रा. बिर्ला रोड मलकापूर, ता.मलकापूर,
जि.बुलढाणा, आधार नं. ४९४८९०९३९३१०
पॅन नं.
२. श्री. प्रभाकर दत्तु राणे
वय अं. ५१ वर्षे, धंदा — व्यापार
रा. आकांशा निवास, गणेश मंदिराजवळ,
एकता नगर, बुलढाणा, ता.जि.बुलढाणा
आधार नं. ६६४७ ५७७४ ८८८०
पॅन नं.

लिहुण घेणार :— श्रीनिवास पुरूषोत्तम चोपडे
वय अं. ४१ वर्षे, धंदा — वेल्डींग व्यवसाय
रा. जहागीरपूर माकोडी, ता.मलकापूर,
जि.बुलढाणा

आधार नं. ९०६२ १०८९ ७८४६

पॅन नं.

मी लिहुन देणार स्थावर मालमत्तेचे खरेदीखत लिहुन देतो ते येणेप्रमाणे....

१. **भरणा :—** सदर मिळकत विक्री एकुण किंमत रू. २७,००,०००/— अक्षरी सत्तावीस लक्ष रूपयामध्ये केलेला असुन तुम्ही मला आजरोजी २७,००,०००/— (अक्षरी सत्तावीस लक्ष रूपयाचा) आय.सी.आय.सी.आय होम फायनान्स कंपनीचा चेक तुमचे कडुन मला आजरोजी प्राप्त झालेले आहे. याप्रमाणे भरण्याची संपूर्ण रक्कम २७,००,०००/— (अक्षरी सत्तावीस लक्ष रूपयाचा) पूर्ण भरणा मला मिळाला आहे. आता माझी भरण्याबद्द्ल तक्रार राहीली नाही. या रूपयाऐवजी मी माझे मालकीची व ताब्यातील स्थावर माल खरेदी दिला तो येणेप्रमाणे.

२. **स्थवार मिळकतीचे वर्णन —**

मौजे मलकापूर भाग २, ता.मलकापूर, जि.बुलढाणा येथील शेत गट नं. ३००/६, क्षेत्रफळ २ हे ४६ आर, पोटखराब ०.४६ आर, मधील जमीन विद्यमान उपविभागीय अधिकारी साहेब कोर्ट, मलकापूर हयांचे फाईलावरील आर,पी,बी,एल,डी/२०२६/ एपीएल/ ६९१२९ निकाल ता.१०/०८/२०२६ अन्वये अकृषक करण्यात आलेली आहे. त्या लेआउट नकाशानुसार प्लॉट नं. ३, क्षेत्रफळ ४९७.५८९ चौ.मीटर (५३५६.०० चौ.फुट) या प्लॉट नं. ३ च्या चर्तुसिमा पुढील प्रमाणे ...

पूर्वेस :— प्लॉट नं. ४ व ५
पश्चिमेस :— बोदवड रोड
उत्तरेस :— प्लॉट नं. २
दक्षिणेस :— १२ मीटरचा लेआउट रोड

या चर्तुसिमेच्या आतील वर्णनाचा स्था.माल, दगड माती भुमिसह व तदंगभूत वस्तुसह कि.रूपये २७,००,०००/— अक्षरी सत्तावीस लक्ष रूपयामध्ये तुम्हास खरेदी दिला आहे व वरील स्थावर माल आजरोजी तुमचे ताब्यात दिला आहे.

वरील स्थावर माल आमचे पूर्ण मालकीचा व ताब्यातील असुन तो मी तुम्हास वरील रूपयाचे मोबदल्यात खरेदी दिला आहे व स्थावर माल आजरोजी तुमचे ताब्यात दिला आहे.

३. या प्लॉटवरील आजपर्यंतचा अकृषक कर व इतर सर्व प्रकारचे सरकारी कर मी पूर्णपणे भरलेले आहेत. निघाल्यास त्यास मी पूर्णपणे जबाबदार राहील. तसेच यापुढील सर्व कराची भरणा हे लिहुन घेणार यांनी भरत जावे. त्यास मी जबाबदार राहणार नाही.

४. सदर प्लॉट माझी स्वकष्टार्जित मिळकत आहे. हस्तांतरीत करण्यात येणारी मालमत्ता ही शासकीय निमशासकीय स्थानिक स्वराज्य, संस्था, धर्मदाय संस्था, कुळकायदयाने प्राप्त, इनामी शासनाची किंवा आदिवासी यांचे मालकीची नाही तसेच या मिळकती बाबत कुठल्याही न्यायालयात वाद नाही, किंवा न्यायप्रविष्ठ नाही. निघाल्यास मी म्हणजे लिहुन देणार जबाबदार राहील. सदर

व्यवहार हा कोणत्याही प्रकारे व्याजाचा अथवा सावकारीचा नाही.

सदर प्लॉट मी यापूर्वी गहाण, खरेदी, बक्षीस वगैरे अन्यलेखाने दुसरे कोणास लिहुन दिलेली नाही. तसे निघाल्यास अगर कोणी कोणतेही वेळेस दावा वगैरे केल्यास त्या दाव्याचे सर्व प्रकारचे नुकसानीस मी पूर्णपणे जबाबदार राहील.

**प्रतिज्ञापत्र**

दि. /०८/२०२६ सदर दस्तऐवज हा नोंदणी कायदा १९०८ अंतर्गत असलेल्या तरतुदीनुसार नोंदणीस दाखल केलेला आहे. दस्तातील संपूर्ण मजकूर, निष्पादक व्यक्ती, साक्षीदार व सोबत जोडलेल्या कोगदपत्रांची सत्यता आम्ही उभयतांनी (घेणार व देणार) तपासली आहे. दस्ताची सत्यता, वैधता, कायदेशिर बाबींसाठी दस्त निष्पादक व कबुलीधारक हे पूर्णपणे जबाबदार राहतील.

करीता सदरचा खारेदीखाताचा लेखा मी दि. /०८/२०२६ रोजी माझे राजीखूशीने, कोणाचेही दबावाखाली न येता, कोणताही नशा पानी न करता मु. मलकापूर येथे लिहून तो वाचुन व समजून त्यावर दोन साक्षीदारांसमक्ष सहि केली आहे. सदरचा लेख माझेवर व माझे इस्टेट वारसांवर सुध्दा बंधनकारक राहील.

करीता हा खरेदीखताचा लेख,

ता. /०८/२०२६

ठिकाण —

खरेदी लिहुन देणार

(कुलवर्धीनी डेव्हलपर्स मलकापूर तर्फे

पार्टनर

१.श्री पंकज चिमणलाल मुंधडा)

सही लिहुन देणार अंगठा

————————— ————————

(२.श्री. प्रभाकर दत्तु राणे)

सही लिहुन देणार अंगठा

————————— ————————

खरेदी लिहुन घेणार

(श्रीनिवास पुरूषोत्तम चोपडे)

सही लिहुन देणार अंगठा

————————— ————————

साक्षीदार

१.——————————

वय अं. वर्ष, धंदा — शेती,

रा.

आधार कार्ड नं.

सही अंगठा

——————— ————————

२.——————————

वय अं. वर्ष, धंदा — शेती,

रा.

आधार कार्ड नं.

सही अंगठा

——————— ————————